# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

माहितीचा अधिकार

---

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

### अपील क्रमांक : ६२१/२०२५

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. अनमोल गोपिचंद कावळे,<br>मु.पो. नेरला, ता. पवनी,<br>जि. भंडारा-४४१९०३ | कृषि अधिकारी, पंचायत समिती, पवनी ता. पवनी, जि. भंडारा | सहा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पवनी, ता. पवनी, जि. भंडारा |

### सुनावणी दिनांक :- ०३.०९.२०२६

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०७.०३.२०२५

(२) व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०७.०३.२०२५

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती अप्राप्त.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याबाबत विनंती केली आहे.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २८.०३.२०२४

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २८.०३.२०२४

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २००७

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : गोपीचंद सिताराम कावळे मौजा नेरला ता. पवनी जि. भंडारा यांनी आपल्या शेतात (गट क्र. ४१४ एकूण क्षेत्र २.४० हे.आर.) येथे विशेष घटक योजनेअंतर्गत विहीर बांधकाम लाभ मिळणे करीता आपल्या पं.स. पवनी कार्यालयात सन २००७ ला अर्ज सादर केला होता व अर्ज मंजूर होऊन विहीरीचे बांधकाम करणेत आले. तेव्हा अर्जासोबत सादर केलेले दस्त (आवश्यक असलेली सर्व कागदपत्र जोडली होती.) ती सर्वच्या सर्व कागदपत्र (दस्त) माहिती अधिकारातील लोगोव्दारे प्रमाणित करुन देण्यात यावी.



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर सत्यमेव जयते

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती

अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, पंचायत समिती पवनी यांनी दिनांक २३.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, आपण मागणी केलेल्या दस्ताऐवजाचा शोध घेतला असता सदर दस्ताऐवज प्रस्ताव ड वर्गवारीत मोडत असल्याने तसेच प्रस्तावाचा कालावधी १७ वर्षा वरील असल्याने दस्ताऐवजाचे शोध अंती प्रस्ताव उपलब्ध नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे आपण मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याने अर्जाव्दारे माहिती पुरविण्यात येऊ शकत नाही, असे अपिलार्थीस कळविले आहे.

**४. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०२.०५.२०२४

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : उपलब्ध नाही.

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती अप्राप्त

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील

अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती पवनी यांनी दिनांक २९.०१.२०२५ रोजी सुनावणी घेवून, जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागणी केलेल्या अर्जासोबतचे दस्तऐवजांचा पुनश्च: शोध घेवून आर.टी.आय. लोगोसहीत प्रतींना प्रमाणित करुन अपिलार्थीस ०७ दिवसाचे आत विनाशुल्क पुरविण्यात यावे, असे आदेशित करुन अपील निकाली काढले आहे.

प्रथम अपिलीय आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, आपण मागणी केलेल्या माहितीचा पुनश्च: शोध घेण्यात आला आहे, त्यामध्ये अर्जाच्या संबंधित लाभाचे लाभ वितरण मास्टर नोंदवही व सिंचन विहीर बांधकाम मोजमाप पुस्तिका हे श्री. गोपीचंद सिताराम कावळे, मौजा नेरला यांचा नावाचा उल्लेख असलेला दस्त (कागद) उपलब्ध आहे. परंतु सन २००७ मध्ये अर्जदार यांनी सादर केलेला प्रस्ताव अर्ज प्रती शोधन अंती उपलब्ध नाहीत. करीता उपलब्ध असलेले लाभ वितरणाचे मास्टर नोंदवही व सिंचन विहीर बांधकाम मोजमाप पुस्तीका पानांची आवश्यकता असल्यास विनाशुल्क पुरविण्यात येईल तसे कळविण्यात यावे, असे अपिलार्थीस कळविले.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा —**

१. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, माहिती अर्जानुसार आजपर्यंत कोणतीही माहिती मिळालेली नाही. त्यामुळे संबंधितांना माहिती देण्याबाबत आदेशित करावे.

२. आज सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, पंचायत समिती पवनी, श्री. संजय तुळशिराम लांजेवार व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा. गटविकास अधिकारी, श्री. कविश्वर खोब्रागडे उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, पंचायत समिती पवनी, श्री. संजय तुळशिराम लांजेवार यांनी नमूद केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागितल्याप्रमाणे कार्यालयीन रेकॉर्ड शोधला असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जात नमूद केलेला अर्ज व त्यासोबत जोडलेले कागदपत्रे

आढळून आले नाही. अपिलार्थी यांनी विशेष घटक योजनेअंतर्गत विहीर बांधकामाचा लाभ मिळणे करीता पं.स. पवनी कार्यालयात सन २००७ ला सादर केलेला अर्ज हा वर्ग –ड चा भाग आहे. त्यामुळे तो आढळून आलेला नाही. एम.बी. कायमस्वरुपी रेकॉर्ड हा आहे. ती अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांचा अर्ज व त्यासोबत जोडलेले कागदपत्रे ही वर्ग-ड चे दस्ताऐवज असल्यामुळे ती कार्यालयात आढळून आलेले नाही. त्यामुळे ती अपिलार्थीस पुरविता आली नाही. प्रथम अपिलीय आदेशानुसार अपिलार्थीस दिनांक ०४.०२.२०२५ रोजी पत्राव्दारे कळविले आहे.

त्यावर अपिलार्थी यांनी नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ०४.०२.२०२५ रोजीचे पत्र मिळालेले नाही. त्यामुळे मला झालेल्या आर्थिक, मानसिक व शारिरीक त्रासापोटी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ३०,०००/- नुकसान भरपाई देण्याबाबत आदेशित करावे.

**६. निष्कर्ष –**

सदर प्रकरणी अपिलार्थी श्री. कावळे यांनी दिनांक २८.०३.२०२४ रोजी कृषि अधिकारी, पंचायत समिती, पवनी, ता. पवनी, जि. भंडारा यांचेकडे माहितीसाठी अर्ज केला होता. त्यांच्या या माहिती अर्जाला जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, आपण मागणी केलेल्या दस्ताऐवजाचा शोध घेतला असता सदर दस्ताऐवज प्रस्ताव ड वर्गवारीत मोडत असल्याने तसेच प्रस्तावाचा कालावधी १७ वर्षा वरील असल्याने दस्ताऐवजाचे शोध अंती प्रस्ताव उपलब्ध नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे आपण मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याने अर्जाव्दारे माहिती पुरविण्यात येऊ शकत नाही, असे अपिलार्थीस कळविले आहे. तसेच प्रथम अपिलीय आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, आपण मागणी केलेल्या माहितीचा पुनश्च: शोध घेण्यात आला आहे, त्यामध्ये अर्जाच्या संबंधित लाभाचे लाभ वितरण मास्टर नोंदवही व सिंचन विहीर बांधकाम मोजमाप पुस्तिका हे श्री. गोपीचंद सिताराम कावळे, मौजा नेरला यांचा नावाचा उल्लेख असलेला दस्त (कागद) उपलब्ध आहे. परंतु सन २००७ मध्ये अर्जदार यांनी सादर केलेला प्रस्ताव अर्ज प्रती शोधन अंती उपलब्ध नाहीत. करीता उपलब्ध असलेले लाभ वितरणाचे मास्टर नोंदवही व सिंचन विहीर बांधकाम मोजमाप पुस्तीका पानांची आवश्यकता असल्यास विनाशुल्क पुरविण्यात येईल तसे कळविण्यात यावे, असे अपिलार्थीस कळविले आहे, असे आज सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाला सांगितले.

याकडे अपिलार्थी यांचे लक्ष वेधले असता, त्यांनी नमूद केले की, मला जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ०४.०२.२०२५ रोजीचे पत्र मिळालेले नाही. त्यामुळे मला झालेल्या आर्थिक, मानसिक व शारिरीक त्रासापोटी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ३०,०००/- नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे.

परंतु, आयोगाने त्यांना नेमके काय नुकसान झाले आहे हे विचारले असता, 'माझी कहाणी वेगळी आहे', एवढेच त्यांनी सांगितले. नेमके काय नुकसान झाले हे ते सांगू शकले नाहीत. ही बाब लक्षात घेता, त्यांनी मागितल्याप्रमाणे ३०,०००/- रुपयांची नुकसान भरपाई त्यांना दिली जाऊ शकत नाही.



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★नागपूर★ सत्यमेव जयते

तसेच अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ०४.०२.२०२५ रोजीचे पत्र मिळाले नसल्याचे आज सुनावणी दरम्यान आयोगाला सांगितले. ही बाब लक्षात घेता, विद्यमान जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती रेकॉर्डवर जशी उपलब्ध आहे, ती जशीच्या तशी अपिलार्थीस तत्काळ विनामुल्य पुरविण्यात यावी, या निर्देशासह प्रस्तुत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून, प्रस्तुतचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०३.०९.२०२६**

जावक क्रमांक 6366 दिनांक 07 OCT 2026

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर